
महाराष्ट्र (कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या)
ऊस दराचे विनियमन अधिनियम, 2013
हा कायदा ऊस उत्पादक शेतकरी व साखर कारखाने यांच्यातील व्ययावहार पारदर्शक, न्याय्य व सुव्यवस्थित करण्यासाठी करण्यात आला आहे. या अधिनियामाद्वारे ऊस दर निश्चिती, वेळेत देयक अदा करणे, ऊस नियंत्रण मंडळाची स्थापना, नियमभंगास दंडातत्क कारवाई तसेच शासनास नियम करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील साखर उद्योग व शेतकरी हितसंरक्षासाठी हा एक महत्वापूर्ण कायदा आहे.
मुख्य आकर्षणे
∅ संक्षिप्त नाव व प्रारंभ
∅ महत्त्वाच्या व्याख्या
∅ ऊस नियंत्रण मंडळ
∅ मंडळाची कार्ये
∅ ऊस उत्पादकांना प्रदान
∅ कंपन्यांची जबाबदारी
∅ अपराध व शिक्षा
∅ संरक्षण वबायर्वा
∅ संरक्षण तरतूद
∅ नियम करण्याचा अधिकार
सोप्या भाषेत
कायद्याच
फायद्याचं
लेखक: श्रुतिका मोहन गोचडे
B.A.LLB, DCL
अजय सुनील माने
B.A.LLB, LLM
वर्षाच्या कायद्याचे विहंगम दृश्य

# महाराष्ट्र (कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या) ऊस दराचे विनियमन अधिनियम, 2013

---

महाराष्ट्र (कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या) ऊस दराचे विनियमन अधिनियम, 2013 हा कायदा ऊस उत्पादक शेतकरी व साखर कारखाने यांच्यातील व्यवहार पारदर्शक, न्याय्य व सुव्यवस्थित करण्यासाठी करण्यात आला आहे. या अधिनियमाद्वारे ऊस दर निश्चिती, वेळेत देयक अदा करणे, ऊस नियंत्रण मंडळाची स्थापना, नियमभंगास दंडात्मक कारवाई तसेच शासनास नियम करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील साखर उद्योग व शेतकरी हितसंरक्षणासाठी हा एक महत्त्वपूर्ण कायदा आहे.

---

## प्रस्तावना

महाराष्ट्र राज्य हे देशातील अग्रगण्य साखर उत्पादक राज्य असून, राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत ऊस शेती व साखर उद्योगाला विशेष महत्त्व आहे. ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर कारखाने यांच्यातील आर्थिक संबंध सुदृढ, न्याय्य व पारदर्शक राहावेत, तसेच ऊसाच्या दराबाबत उद्भवणारे प्रश्न योग्य पद्धतीने सोडविले जावेत, या उद्देशाने महाराष्ट्र (कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या) ऊस दराचे विनियमन अधिनियम, 2013 लागू करण्यात आला आहे.

या अधिनियमाद्वारे ऊस दर निश्चिती, देयकांची वेळेत अदा, ऊस नियंत्रण मंडळाची स्थापना, नियमभंगास दंडात्मक तरतुदी आणि शासनास नियम करण्याचा अधिकार अशा विविध बाबींची व्यवस्था करण्यात आली आहे. शेतकरी हितसंरक्षण, साखर उद्योगातील शिस्त आणि कृषी-औद्योगिक समन्वय साधण्यासाठी हा अधिनियम महत्त्वपूर्ण ठरतो.

---

## पुस्तकाचे उद्दिष्ट / Objective of the Book

या पुस्तकाचे मुख्य उद्दिष्ट महाराष्ट्र (कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या) ऊस दराचे विनियमन अधिनियम, 2013 हा कायदा सोप्या, स्पष्ट आणि सर्वांना समजेल अशा भाषेत वाचकांसमोर मांडणे हे आहे.

ऊस उत्पादक शेतकरी, साखर कारखाने, विद्यार्थी, कायदे अभ्यासक, अधिकारी आणि सर्वसामान्य नागरिक यांना या अधिनियमातील तरतुदी, अधिकार, जबाबदाऱ्या आणि प्रक्रियेची योग्य माहिती मिळावी, हा या पुस्तकाचा हेतू आहे.

तसेच शेतकरी हितसंरक्षण, वेळेत देयके, न्याय्य दर आणि कायदेशीर जागरूकता याबाबत समाजात समज वाढविणे हेही या पुस्तकाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

---

## मुख्य आकर्षणे

- संक्षिप्त नाव व प्रारंभ
- महत्त्वाच्या व्याख्या
- ऊस नियंत्रण मंडळ
- मंडळाची कार्ये
- ऊस उत्पादकांना प्रदान
- अपराध व शिक्षा
- अपराधाची दखल
- कंपन्यांची जबाबदारी
- संरक्षण तरतूद
- नियम करण्याचा अधिकार

---

लेखक

श्रुतिका मोहन गोचडे

अजय सुनील माने

**संपर्क:**

: ७२६३८८९२९२

: कायद्याचं आणि फायद्याचं

**ईमेल:** asconsultancy69@gmail.com

---

# अनुक्रमणिका

## महाराष्ट्र (कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या) ऊस दराचे विनियमन अधिनियम, 2013

---

**सारांश**


1. प्रस्तावना
2. पुस्तकाचे उद्दिष्ट
3. अधिनियमाची माहिती
4. कलम 1 – संक्षिप्त नाव व प्रारंभ
5. कलम 2 – व्याख्या
6. कलम 3 – ऊस नियंत्रण मंडळ

7. कलम 4 – मंडळाची कार्ये
8. कलम 5 – ऊस उत्पादकांना प्रदान
9. कलम 6 – अपराध व शिक्षा
10. कलम 7 – अपराधाची दखल
11. कलम 8 – अपराध आपसात मिटविणे
12. कलम 9 – कंपन्यांनी केलेले अपराध
13. कलम 10 – लोकसेवक तरतूद
14. कलम 11 – संरक्षण तरतूद
15. कलम 12 – नियम करण्याचा अधिकार
16. महत्त्वाचे प्रश्नोत्तरे (FAQs)
17. महत्त्वाचे न्यायनिर्णय
18. कायदेशीर शब्दकोश
19. परिशिष्टे
20. संदर्भ
21. लेखकाची नोंद
22. शेवटचे शब्द

---

**सन 2013 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 33**

**(माननीय राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक 24 डिसेंबर 2013 रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)**

**महाराष्ट्र राज्यातील साखर कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या ऊसाच्या दराचे विनियमन करण्यासाठीचा अधिनियम.**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यातील साखर कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या ऊसाच्या दराचे विनियमन करणे, तसेच त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चौसष्ठाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**1.** (1) या अधिनियमास **महाराष्ट्र (कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या) ऊस दराचे विनियमन अधिनियम**, 2013 असे म्हणावे.

---

**(2)** तो, राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे निश्चित करील अशा दिनांकास अमलात येईल.

या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

**(क)** "मंडळ" याचा अर्थ, कलम 3 अन्वये गठित केलेले ऊस नियंत्रण मंडळ, असा आहे.

**(ख)** "मुख्य सचिव" याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा मुख्य सचिव, असा आहे.

**(ग)** "साखर आयुक्त" याचा अर्थ, साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, असा आहे.

**(घ)** "कारखाना" याचा अर्थ, जिथे साखर उत्पादनाशी संबंधित कोणतीही निर्मिती प्रक्रिया विद्युतशक्तीच्या सहाय्याने चालविली जाते किंवा सामान्यतः चालविली जाते आणि ज्यात मागील बारा महिन्यांमध्ये कोणत्याही दिवशी वीस किंवा त्यापेक्षा अधिक कामगार काम करीत असतील किंवा काम करीत होते, असा साखर कारखाना, असा आहे.

**(ङ)** "शासन" किंवा "राज्य शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे.

**(च)** "कारखान्याचा भोगवटादार" याचा अर्थ, कारखान्याच्या कारभारावर नियंत्रण असलेली व्यक्ती असा आहे आणि उक्त कारभार हा संचालक, भागीदार किंवा यथास्थिती प्रशासक यांच्याकडे सोपविलेला असेल, तर त्याबाबतीत असा संचालक, भागीदार किंवा प्रशासक असा आहे.

**(छ)** "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे.

**(ज)** "सचिव" याचा अर्थ, शासनाचा सचिव, असा आहे.